# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. १६/ २०१३** | **दिनांक २७.१०.२०१३**
**स्थळ- शिर्डी कार्यालय** | **वेळ- दुपारी- ०२.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा रविवार दि.२७.१०.२०१३ रोजी दुपारी ०२.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात (साईनिवास अतिथीगृहात) आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं. एसएसएस/ वशी-०४/ ३३७१/ २०१३, दिनांक २६ ऑक्टोबर, २०१३ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा रविवार दि.२७.१०.२०१३ रोजी दुपारी ०२.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहात मा.अध्यक्ष श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. श्री.अजय मोरे, कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.डॉ.संजीवकुमार, जिल्हाधिकारी, अहमदनगर, तथा सदस्य यांनी दूरध्वनीवरुन कळविले. त्याची नोंद घेण्यात येऊन, समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.०१ <u>(अ) नोंद घेण्याचे विषय.</u>**

**०१. श्री साईबाबा रुग्णालयात माहे जुलै व ऑगस्ट- २०१३ मध्ये वैद्यकिय बीलात दिलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

श्री साईबाबा रुग्णालयात माहे जुलै व ऑगस्ट- २०१३ मध्ये वैद्यकीय बीलांमध्ये रु.६५,२४,८२०/- व रु.६२,६२,६३१/- याप्रमाणे देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.८५४ (A) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०२. पाणी तपासणी अहवाल माहे सप्टेंबर, २०१३.**

माहे सप्टेंबर- २०१३ मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे.एनव्हायरो लॅब, नाशिक यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.८५४ (B) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभाग प्रमुख)

---

**०३. माहे सप्टेंबर- २०१३ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेणे.**

माहे सप्टेंबर- २०१३ मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या ५३,७६३ मनुष्य दिनांच्या कर्मचाऱ्यांच्या/ कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.८५४ (C) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

**०४. माहे ऑगस्ट, सप्टेंबर- २०१३ मध्ये दर्शन रांगेतील साईभक्तांना मोफत लाडू प्रसादाचे वाटपाची नोंद घेणे.**

१५ ऑगस्ट पासुन ३१ ऑगस्ट-२०१३ व माहे सप्टेंबर- २०१३ मध्ये दर्शन रांगेतील साईभक्तांना अनुक्रमे ९,१०,८००, १३,४१,६०० पाकिटे व त्यासाठी रु.१,२१,३१,८५६/-, रु.१,७८,७०,११२/- आलेल्या खर्चाची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.८५४ (D) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

**विषय नं.०२ श्री साईबाबा रुग्णालयातील वॉर्ड/ ओ.टी. तील सोफे दुरुस्तीबाबतचे प्राप्त कोटेशन उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील डिलक्स रुमला सन २००६ ला एकुण ५ सोफे देण्यात आलेले आहेत सध्या ते सोफे फाटलेले असल्याने दुरुस्त करुन मिळावे याकरीता त्या विभागाच्या इन्चार्ज सिस्टरांनी

डि.पी.नं.७२२ दि.२२/११/२०११ अन्वये मागणी केली आहे त्यामुळे सर्वच वॉर्ड व ओ.टी च्या सोफ्यांची पाहणी केली असता एकुण २३ बदलावे लागतील जेणे करुन एकत्रीत काम करुन घेतल्यावर खर्च देखील कमी येईल व वारंवार प्रस्ताव ठेवण्याची गरज पडणार नाही.

तरी उपरोक्तप्रमाणे सोफ्यांचे कुशनचे काम करुन घेणेकरीता विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदीस व याकामी येणारा खर्च अंदाजे रु.६२,१००/- चे खर्चास मान्यता मिळाली असुन त्यास अनुसरुन इकडील पत्र क्र.५७०२ दि.३१/०१/२०१२ अन्वये एकुण ८ पुरवठाधारकांकडुन दि.११/०२/२०१२ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते व त्यास अनुसरुन ५ पुरवठाधारकांकडुन बंद कोटेशन प्राप्त झालेले होते. सदर पुरवठाधारकांना मा.व्य.सभा दि. ०६/०४/२०१२ चे सभेत कोटेशन धारकांना सभेपुढे नमुने घेऊन समक्ष बोलविण्यात आले होते व त्यावेळी दोनच पुरवठाधारक उपस्थित होते. प्राप्त कोटेशन धारकांचे नमुने व दर समाधानकारक न वाटल्याने त्यासभेत नि.क्र.२६६ अन्वये सदर सोफे दुरुस्तीकामी लागणारे रेक्झीन व फोम हे वैद्यकीय संचालक यांनी समक्ष जाऊन खरेदी करावे व इतर दुरुस्तीचे दर मागवून दुरुस्ती करुन घ्यावी असा निर्णय झालेला आहे.

त्यानुसार इकडील पत्र क्र.२४५८ दि.१३/०८/२०१२ अन्वये एकुण आठ पुरवठाधारकांना प्रत्यक्ष जाऊन कोटेशन पत्र देण्यात आले. त्यास अनुसरुन चार कोटेशनधारकांचे सिलबंद कोटेशन पत्र व नमुने प्राप्त झालेले होते.

उपरोक्तप्रमाणे चार कोटेशन धारकांना मा.त्रिसदस्य समिती सभा दि.०८/१२/२०१२ रोजीचे सभेत चर्चा/वाटाघाटीकरीता समक्ष बोलविण्यात आले होते. त्यापैकी मे.अॅडव्हेंचर मॅट्रेसेस,अहमदनगर हे एकमेव कोटेशनधारक चर्चा/वाटाघाटीसाठी उपस्थित होते. चर्चा/वाटाघाटीनंतर त्यांना इकडील पत्र क्र.८७७२ दि.१३/०२/२०१३ अन्वये सोफा दुरुस्तीचा पुरवठा आदेश देण्यात आला होता.

परंतु त्यांनी आजपर्यंत सोफ्याचे काम केले नाही व वारंवार दुरध्वनीवरुन विचारले असता त्यांनी इतक्या कमी दरामध्ये काम करणे परवडत नाही असे सांगितले. त्यानंतर दुसऱ्या क्रमांकाचे पुरवठाधारक (२$^{nd}$ Lowest) मे.व्यंकटेश फर्निशींग,राहाता त्यांना दुरध्वनीद्वारे विचारले असता ते काम करण्यास तयार झाले त्यामुळे दि.१६/०४/२०१३ चे मंजुर टिपणी अन्वये त्यांना इकडील पत्र क्र.८५५ दि.१७/०५/२०१३ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आला, परंतु त्यांनीही अद्यापपर्यंत काम केलेले नाही त्यामुळे त्यांना दुरध्वनीद्वारे विचारले असता त्यांनी असे सांगितले की, कोटेशनमधील दर हे फक्त मालाचेच होते त्यामध्ये मंजुरी दिलेली नव्हती, व आता सर्व मालाचे तसेच फोमचे दर वाढलेले आहे तसेच मजुरीही वाढलेली आहे त्यामुळे त्यांनाही काम करणे परवडत नाही असे सांगितले. त्यामुळे मा.त्रिसदस्य समिती सभा २६/०७/२०१३ चे सभेत फेरकोटेशन मागविणेस मंजुरी मिळाली आहे, त्यानुसार इकडील पत्र क्र.२७५२ दि.२८/०८/२०१३ अन्वये एकुण ९ पुरवठा धारकांना दि. २०/०९/२०१३ अखेर कोटेशन पाठविण्याबाबतचे पत्र पाठविले होते त्यास अनुसरुन एकुण ३ पुरवठा धारकांनी कोटेशन पाठविले आहे त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | पुरवठा धारकाचे नाव | प्राप्त दिनांक | प्राप्त स्थिती |
|---|---|---|---|
| १ | मे.व्यंकटेश फर्निशींग ,राहाता | ०७/०९/२०१३ | बंद स्थिती |
| २ | मे.राहुल कुशन,बाभळेश्वर | ०९/०९/२०१३ | बंद स्थिती |
| ३ | मे.प्रगती कुशन,राहाता | १०/०९/२०१३ | बंद स्थिती |

वरीलप्रमाणे ०३ सीलबंद कोटेशन आजचे सभेपुढे उघडून येऊन कोटेशनधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, तीनही कोटेशनधारक चर्चा/ वाटाघाटीसाठी अनुपस्थित होते. त्यांनी कोटेशनमध्ये दिलेले मुळ दर खालीलप्रमाणे-

| अ. नं. | तपशिल | मे.व्यंकटेश फर्निशींग ,राहाता | | मे.राहुल कुशन,बाभळेश्वर | | मे.प्रगती कुशन,राहाता | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कोटेशनमधील दर रु. | चर्चा/ वाटाघाटी अंती देऊ केलेले दर रु. | कोटेशनमधील दर रु. | चर्चा/ वाटाघाटी अंती देऊ केलेले दर रु. | कोटेशनमधील दर रु. | चर्चा/ वाटाघाटी अंती देऊ केलेले दर रु. |
| ०१ | वॉर्ड/ ओ.टी. तील सोफे दुरुस्ती व मजुरी | **१४३७५१/-** | अनुपस्थित | १६०९८५/- | अनुपस्थित | १५७४४५/- | अनुपस्थित |

**निर्णय क्र.८५५ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील वॉर्ड/ ओ.टी. तील २३ नग सोफे दुरुस्तीकामी लागणारे कापड, फोम, इतर आवश्यक साहित्य व मजुरीसह मे.व्यंकटेश फर्निशींग, राहाता यांचे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

**तसेच, याकामी येणाऱ्या जादा खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.०३ साईआश्रम भाग-०१ कडे व साईआश्रम धर्मशाळा येथे बसविण्यात आलेल्या R.O.Plant व Water Cooler करीता विद्युतीकरण करणेकामी प्राप्त झालेली कोटेशन्स उघडून कोटेशनधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१-०६-२०१३ चे सभेतील विषय नं. ५१ निर्णय ४८४ अन्वये साईआश्रम भाग-०१ कडे व साईआश्रम धर्मशाळा येथे बसविण्यात आलेल्या R.O.Plant व Water Cooler करीता विद्युतीकरण करणेकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.४,९७,४६६/- मात्रचे खर्चास, कोटेशन मागविणेस व कोटेशन नोटीस साईटेक (आयटी) विभागामार्फत वेबसाईटवर प्रसिद्ध करणेस मान्यता मिळालेली आहे. कोटेशनची विक्री दि. १६-०९-२०१३ पासून चालू करण्यात येऊन दि. २८-०९-२०१३ पर्यंत करण्यात आली. कोटेशन सबमिशन तारीख दि.०१-१०-२०१३ अशी होती.

जा.नं.एसएसएस / विद्युत / २७३७ / २०१३ दि.१७-०९-२०१३ अन्वये कोटेशन्स मागविण्यात आली आहे.त्यानुसार खालीलप्रमाणे ०५ कोटेशन प्राप्त झाली आहेत. कोटेशन तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | कोटेशन धारकाचे नांव | शेरा |
|---|---|---|
| ०१) | मे.जाधव इलेक्ट्रीकल्स, कोपरगांव | बंद कोटेशन पाकीट-०१<br>सोबत ईएमडी पाकीट-०१ |
| ०२) | मे.हिंदुस्थान एनरमॅक्स, नाशिक | बंद कोटेशन पाकीट-०१<br>सोबत ईएमडी पाकीट-०१ |
| ०३) | मे.श्री साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | बंद कोटेशन पाकीट-०१<br>सोबत ईएमडी पाकीट-०१ |
| ०४) | मे.व्दारकाधिश इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | बंद कोटेशन पाकीट-०१<br>सोबत ईएमडी पाकीट-०१ |
| ०५) | मे.गुरु इंजिनिअरींग ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर, नाशिक | बंद कोटेशन पाकीट-०१<br>सोबत ईएमडी पाकीट-०१ |

उपरोक्तप्रमाणे साईआश्रम भाग-०१ कडे व साईआश्रम धर्मशाळा येथे बसविण्यात आलेल्या R.O.Plant व Water Cooler करीता विद्युतीकरण करणेकामी प्राप्त झालेली कोटेशन्स उघडून कोटेशनधारकांशी चर्चा / वाटाघाटी करुन निर्णय होणेस विनंती.

| अ.क्र. | कोटेशन धारकाचे नांव | **कोटेशनमधील दर रु.** | **चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केले दर रु.** |
|---|---|---|---|
| ०१) | मे.जाधव इलेक्ट्रीकल्स, कोपरगांव | ४,७६,७४०/- | **४,५१,०००/-** |
| ०२) | मे.हिंदुस्थान एनरमॅक्स, नाशिक | ४,६९,०००/- | ४,६९,०००/- |
| ०३) | मे.श्री साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | ५,००,२७०/- | ५,००,२७०/- |
| ०४) | मे.व्दारकाधिश इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | ६,५६,९४४/- | ६,५६,९४४/- |
| ०५) | मे.गुरु इंजिनिअरींग ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर, नाशिक | ५,९१,८००/- | ५,५०,०००/- |

**निर्णय क्र.८५६ यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भाग-०१ कडे व साईआश्रम धर्मशाळा येथे बसविण्यात आलेल्या R.O.Plant व Water Cooler करीता विद्युतीकरण करणेकामी मे.जाधव इलेक्ट्रीकल्स, कोपरगांव यांचे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा. असे ठरले.** (कार्यवाही- विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०४ व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी, नोईडा यांना मेंटेनन्सचे वार्षिक कॉन्ट्रॅक्ट देणेबाबत**

**निर्णय क्र.८५७ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख )

---

**विषय नं.०५ शिर्डी येथील स.नं.१७१/१२ पै. मधील जागेवर संस्थान निधीतून बस स्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम ठेकेदार मे.पाटील कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.पुणे यांचे मुदतवाढ मागणीबाबत व ठेकेदार कंपनीचे झालेल्या बदलाविषयी त्यांचेशी करारनामा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद :-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ च्या कलम १७ (१) मधील तरतुदींनुसार भक्तांना सोयी-सुविधा पुरविणे हे व्यवस्थापन समितीचे कर्तव्य असल्याने, महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्रमांकः- सासंवि २००६/६०७/ (८७) / का. सोळा मंत्रालय, मुंबई -४०० ०३२, दि.१३/०१/२००९ अन्वये शिर्डी येथील बसस्थानक अत्याधुनिक पद्धतीने बांधण्याकरीता रु.७,६५,५०,८९८/- मात्र इतक्या खर्चास शासन मान्यता देण्यात आली आहे.

**व्यवस्थापन समिती निर्णय :-**

०१. मा. व्यवस्थापन समितीचे दि.१८/०४/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र.३६२ अन्वये ठेकेदार पाटील कन्स्ट्रक्शन, पुणे यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.

०२. मा. व्यवस्थापन समितीचे दि.१४/०१/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८१ अन्वये, ठेकेदार पाटील कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.,पुणे यांना दि.३१/०७/२०१२ अखेर मूदतवाढ देण्यात यावी. मात्र दरवाढीची मागणी केल्यास ती अमान्य करण्यात यावी, असे ठरले.

०३. मा. व्यवस्थापन समितीचे दि.१५/०९/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७४६ अन्वये, ठेकेदार यांना

काम पूर्ण करणेकरीता दि.२८/०२/२०१३ अखेर मूदतवाढ देणेस मान्यता देणेत आली.

०४. मा. व्यवस्थापन समितीचे दि.१७/०९/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६१५ अन्वये, ठेकेदार यांना दि.३०/११/२०१३ अखेर मूदतवाढ देणेस मान्यता देणेत आलेली आहे.

**प्रस्तावना :**

शिर्डी येथील स.नं. १७१/१२ पै. मधिल बसस्थानकाचे जागेवर संस्थान निधीतून अद्ययावत बसस्थानकाचे बांधकाम करणेकरीता ठेकेदार पाटील कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.,पुणे यांना इकडील जा.नं.६८२१/२०१० दि.२९/०४/२०१० अन्वये कार्यादेश देणेत आलेला आहे. सदर कामाचा तपशिल खालिलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | कामाचे नांव | :- | शिर्डी बसस्थानक व त्यावरील भक्तनिवास संस्थान निधीतून विकसीत करणे. |
| ०२ | आर्किटेक्ट | :- | मे. काबरे चौधरी आर्किटेक्टस्, नाशिक |
| ०३ | ठेकेदार | :- | मे.पाटील कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे |
| ०४ | मंजूर निविदा रक्कम | :- | रु. ७,६०,९०,०८९/- |
| ०५ | कार्यादेश क्र. व दिनांक | :- | जा.क्र.६८२१/१०, दि.२९/०४/२०१० |
| ०६ | करारनाम्यानुसार काम सुरु करण्याचा दिनांक | :- | १४/०५/२०१० |
| ०७ | प्रत्यक्ष काम सुरु केल्याचा दिनांक | :- | २६/०६/२०१० |
| ०८ | काम पूर्ण करण्याचा कालावधी | :- | १५ महिने |
| ०९ | करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याचा दिनांक | :- | १३/०८/२०११ |
| १० | मुदतवाढ | :- | मा.व्य.स.निर्णय क्र.८१, दि.१४/०१/२०१२ अन्वये दि.३१/०७/२०१२ अखेर प्रथम मुदतवाढ तसेच मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र. ७४६ दि.१५/०९/२०१२ अन्वये दि.२८/०२/२०१३ अखेर व्दितीय मूदतवाढ देणेत आली आहे. |
| ११ | कामाची सद्यस्थिती | :- | १. तळमजला अधिक तीन मजल्याचे आर.सी.सी. काम पूर्ण, O.H. वॉटर टॅकचे आर.सी.सी. काम पूर्ण.<br>२. बाहेरील बाजुचे उत्तर, पुर्व बाजुचे प्लास्टर पूर्ण. पुढील काम प्रगतीपथावर<br>३. आतील प्लास्टर ९०% पुर्ण.<br>४. प्लंबींग व वॉटरप्रुफींगचे काम चालू आहे.<br>५. फ्लोअरींग,डॅडोचे काम प्रगतीपथावर आहे. |

ठेकेदार यांनी निविदा सादर करतांना मे. पाटील कन्स्ट्रक्शन्स, पुणे या नांवाने सादर केली होती. त्यानुसार त्यांची निम्नतम दराची निविदा मंजूर झाल्याने त्यांना पाटील कन्स्ट्रक्शन्स, पुणे या नांवाने कार्यादेश देणेत आला आहे. कार्यादेश दिले नंतर कंपनीचे नांवात मे. पाटील कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.पुणे असा बदल झालेला असून कंपनी अधिनियम १९५६ (१) नुसार दि.१७/०३/२०१० रोजी नोंदणी झाल्याचे सर्टिफिकेट नुसार ठेकेदार यांचेशी या नांवानेच करारनामा करणेत आला आहे. आता, दि.२२/०३/२०१३ चे पत्रान्वये ठेकेदार यांनी कंपनीचे नांव मे. पाटील कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि., पुणे असे झाल्याचे कळविले असून, त्याचे कंपनी अधिनियम १९५६ भाग (४४) मधिल ३१/२१ चे शर्तीस अनुसरुन दि.१९/०८/२०११ रोजी नोंदणीकृत झाल्याचे प्रमाणपत्र सादर केलेले आहे. ठेकेदार यांनी कंपनीचे नांवात वेळोवेळी बदल केल्याचे Memorandum & Articles of Association, Articles of Association as per the companies act १९५६ इ. कागदपत्रांची छायांकीत प्रत सादर केलेली आहे. तरी याबाबत भविष्यात काही कायदेशीर अडचण येऊ नये याकरीता बांधकाम विभागाचे दि.२५/०९/२०१३ रोजीचे मंजूर टिपणीअन्वये ॲड श्री.एस.डी. कुलकर्णी, कोपरगांव यांचेकडून कायदेशीर अभिप्राय घेणेकामी जा.नं.एसएसएसटी/ बांधकाम/ २९१६/ २०१३, दि.३०/०९/२०१३ रोजीचे पत्रान्वये त्यांना विनंती करण्यात आली आहे. तसेच याबाबत दि.०२/१०/२०१३ व दि.०४/१०/२०१३ रोजी बांधकाम विभागाचे श्री.आर.बी.आहेर, उपकार्यकारी अभियंता व श्री.एस.एम. जोरी, शाखा अभियंता यांनी ॲड श्री.एस.डी. कुलकर्णी यांची कोपरगांव येथे समक्ष भेट घेऊन चर्चा केली. त्यावेळी सदर ठेकेदार यांनी नावात बदल केलेला असल्याने त्याबाबत ठेकेदार यांचेशी करारनामा करणे आवश्यक आहे असे ॲड श्री. कुलकर्णी यांनी सांगितले आहे. याप्रमाणे करावयाच्या करारनाम्याचा मसुदा त्यांनी दि.१४/१०/२०१३ रोजी अंतिम करुन दिलेला असून तो सोबत अवलोकनार्थ जोडला आहे.

सुरुवातीला ठेकेदार यांना एकूण १५९५ चौ.मी. बांधकाम क्षेत्रफळापैकी ११६० चौ.मी. क्षेत्रफळाचे क्षेत्र ताब्यात देणेत आले होते. उर्वरीत ४३५ चौ.मी. क्षेत्रफळाचा ताबा बसस्थानकातील वाणिज्य आस्थापनांचा (दुकान गाळ्यांचा) कोर्टात दावा चालू असल्याने मिळालेला नव्हता. ठेकेदार यांनी

ताब्यात मिळालेल्या ११६० चौ.मी. बांधकाम क्षेत्रात दि.१४/०५/२०१० रोजी प्रत्यक्ष कामास सुरुवात केली आहे. ठेकेदार यांना उर्वरीत ४३५ चौ.मी. क्षेत्राचा ताबा दि.०२/०७/२०१२ रोजी प्रत्यक्ष देणेत आला आहे. मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार ठेकेदार यांना इकडील जा.नं.२५२१ दि.०२/०९/२०१३ चे पत्रान्वये मा.त्रीसदस्य समितीचे सभेपुढे समक्ष उपस्थित राहणेबाबत कळविणेत आले आहे.

**प्रस्ताव :-** ठेकेदार यांनी दि.०६/०९/२०१३ चे पत्रान्वये खालील प्रमुख अडचणीमुळे काम पूर्ण करता आले नसल्याचे कळविले आहे.

१. साईटचा पूर्ण एरिया (१००%) ताब्यात न मिळालेमुळे कामाची गती एकसारखी ठेवता आली नाही.

२. शिर्डी परिसरात वाळू उपलब्ध होत नाही. त्यामुळे वाळुच्या उपलब्धतेनुसार काम करावे लागते.

३. सध्या पाण्याचा तुटवडा असून पाणी विकत घेवूनही वेळेवर उपलब्ध होत नाही.

तसेच सदर काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचा आम्ही प्रयत्न करत असून काम पूर्ण करणेकरीता दि.३१/०३/२०१४ पर्यंत मूदतवाढ मिळणेस ठेकेदार यांनी विनंती केली आहे.

याबाबत आर्किटेक्ट काबरे चौधरी, नाशिक यांनी दि.१७/०९/२०१३ चे पत्राव्दारे ठेकेदार यांचे कामास खालील कारणांमुळे विलंब झाला असल्याचे कळविले आहे.

01. No Specific Permanent responsible senior professional Engineer in-charge is deputed on the site
02. Lack of site management and control over the work.
03. Insufficient site staff (only one senior Engineer/ manager working as on today)
04. Insufficient labour force/ labour agenices.
05. Ever changing site technical staff, therefore no consitency in the work. Also which required to supply drawings and details repetitively from architects, structural engineer and S.S.S.T. engineers. Mismanagement in maintaining hard and soft copies.
06. Lack in following proper sequence and co-ordination of various construction activities.

ठेकेदार यांनी कळविलेल्या अडचणींचा विचार करता काम पूर्ण होणेचे दृष्टीने ठेकेदार यांना दि.३१/०३/२०१४ पर्यंत मूदतवाढ देणेस तसेच ठेकेदार यांनी सदर मूदतीत काम पूर्ण न केल्यास त्यापुढील काळात ठेकेदार यांना निविदा शर्तीनुसार दंड आकारणी करणेच्या अटीवर आर्किटेक्ट यांनी शिफारस केली आहे.

**विभागाचा अभिप्राय/ मत :-** याबाबत ठेकेदार यांना आर्किटेक्ट यांनी शिफारस केल्याप्रमाणे दि.३१/०३/२००४ अखेर मूदतवाढ देणेस हरकत नाही. तसेच ठेकेदार कंपनीचे नांवात झालेल्या बदलाविषयी त्यांचेशी अॅड. श्री.एस.डी. कुलकर्णी, कोपरगांव यांनी दिलेल्या सोबत जोडलेल्या मसुद्यानुसार करारनामा करणेत यावा असे मत आहे. तरी त्यासाठी मान्यता मिळणेस विनंती.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८५८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथील स.नं.१७१/१२ पै. मधील जागेवर संस्थान निधीतून बस स्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम ठेकेदार मे.पाटील कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.,पुणे यांना काम पूर्ण करणेसाठी संस्थानचे हक्कांवर बाधा न येण्याचे अटीवर (Without Predjudice) दि.३१.०१.२०१४ अखेर मुदतवाढ देणेस मान्यता देणेत आली.**

**तसेच, सदर कंपनीचे नांवात झालेल्या बदलाविषयी करारनामा करणेबाबत ॲड. एस.डी. कुलकर्णी यांचा लेखी अभिप्राय घेऊन त्यानुसार करारनामा करणेची कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०६** **श्री साईबाबा समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी व दिक्षितवाडा या इमारतींना कोटींग करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम,२००४ मधील तरतूद:-** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे.

**व्यवस्थापन समिती निर्णय :-**

**अ)** दि.२४/०९/२०११ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेत समाधी मंदिर परिसरातील पुरातन इमारतीचे सुदृढीकरण करणेबाबत खालीलप्रमाणे निर्णय क्र. ७०२ संमत करणेत आलेला आहे.

*"प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे इमारतींचे सुदृढीकरणाकरीता पॉलिमर कोटींग करणेकामी सल्लागार नेमून त्यांचे सल्ल्याने विहीत पध्दतीने निविदा मागवून काम करुन घेणेस व याकामी येणाऱ्या योग्य त्या अनुषंगिक खर्चास मान्यता देण्यात आली."*

**ब)** दि.२१/०६/२०१३ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेत समाधी मंदिर इमारतीचे आतील बाजूस सिलींगला रंगकाम करणेबाबत खालीलप्रमाणे निर्णय क्र. ४५० संमत करणेत आलेला आहे.

*"यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात येऊन, श्रीं चे समाधी मंदिर इमारतीचे आतील संपुर्ण छतास रंगकाम करणेस मान्यता देण्यात आली.*
*तसेच, दरवर्षी किंवा आवश्यकतेनुसार दर्शन रांगांचे हॉल व समाधी मंदिराच्या आतील, बाहेरील बाजुने रंगकाम करणेत यावे, असे ठरले."*

**प्रस्तावना :-**

**अ)** उपरोक्त व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार समाधी मंदिराचे भिंतींना पॉलिमर कोटींग करणेस तसेच त्याअगोदर तेथिल संपूर्ण छतास रंगकाम करणेस मान्यता देणेत आली आहे.

**ब)** श्री. एकनाथ रायबा कर्चे, सौरव डेकोरेटर्स, पूणे हे एक साईभक्त असून दि.०६/०९/२०१३ रोजी शिर्डी येथे दर्शनार्थ आले असता, त्यांनी समाधी मंदिरातील रंगकाम देणगीदाखल करण्याची इच्छा व्यक्त केली व तशा आशयाचे पत्र सादर केले. त्यानुसार श्री समाधी मंदिर व त्यापुढील सभामंडपाचे संपूर्ण छताचे अंदाजे १४०० चौ.मी. क्षेत्रफळासाठी Asian Paints Royale Aspira या दर्जेदार स्वरुपाच्या पेंटमध्ये रंगकाम करण्याचे अंदाजे रु.२,१०,०००/- मात्र खर्चाचे काम श्री. कर्चे यांचेकडून देणगीदाखल करुन घेणेसाठी इकडील विभागामार्फत दि.१७/०९/२०१३ रोजी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करण्यात आलेला आहे.

**क)** श्री.मॅनेजर सिंग, Suptdg. Archaeological Chemist, Archaeological Survey of India, Aurangabad हे दि.२९/०८/२०१३ रोजी शिर्डी येथे दर्शनार्थ आले असता, त्यांना मुख्य समाधी मंदिराचे भिंतींचा आतिल व बाहेरील भाग, व्दारकामाई, चावडी व दिक्षितवाडा जतनकार्य करण्याचे दृष्टीने दाखविण्यात आले. सदर पहाणीबाबतचा अहवाल त्यांनी दि.३०/०८/२०१३ रोजीचे ई-मेलव्दारे पाठविलेला असून तो सोबत अलवोकनार्थ ठेवला आहे. सदर अहवालानुसार त्यांनी जतनकार्यासाठी खालिल उपाययोजना सुचविल्या आहेत.

**१) श्री साईबाबा समाधी मंदिराचे बाहेरील पृष्ठभागाकरीता :-**

"The exterior surface of the main shrine is to be chemically cleaned with non-ionic detergent and dilute ammonia. After cleaning it has to get dried. The lower part of the main shrine stone to be applied with paper pulp treatment to extract salt. After extraction of salt it has to be consolidated with appropriate polymer consolidant. After complete drying the stone surface has to be applied with preservative coating."

**०२) व्दारकामाईतील ज्या दगडावर श्री साईबाबा बसत असत तो दगड :-**

"Similarly, the stone piece at Dwarkamai to be chemically cleaned and preserved. The steel strip to be removed with brass/copper so as avoid any rusting in high humidity. The closed compartment of the stone to be provided with some ventilation so as to avoid any buildup of humidity inside."

**३) दिक्षितवाडा इमारतीचे बाहेरील पृष्ठभागाकरीता :-**

"The bricks structure lower part of Dixitwada to be chemically/ mechanically cleaned for removal of thick polymer coating mixed with cement. The pulverized brick to be consolidated after this treatment."

Archceological Survey of India (ASI) ही संस्था भारत सरकारचे सांस्कृतीक मंत्रालयाचे अधिपत्याखाली कार्यरत असून संपूर्ण भारतातील पुरातन वास्तुंचे जतन (Conservation of National and warld heritage monuments) त्यांचेमार्फत करण्यात येते. सदर विभागांतर्गत असलेल्या सायन्स ब्रान्चमार्फत रासायनिक प्रक्रीयेव्दारे जतनकार्य करण्याविषयीचे संशोधन व प्रत्यक्ष जतनकार्य करण्यात येते. सायन्स ब्रान्चमार्फत करण्यात येणाऱ्या कामांबाबत ASI यांचे संकेतस्थळावर खालिलप्रमाणे माहिती नमूद केलेली आहे.

**The main activities of Science Branch are:**

* Chemical treatment and preservation of about 5000 centrally protected monuments including 18 world heritage monuments.
* Chemical treatment and preservation of museum exhibits and excavated objects
  Scientific and technical studies as well as research on material heritage of different building materials to study the causes of deterioration with a view to evolve appropriate conservation measures in order to improve the state of preservation of our built cultural heritage and physical heritage as well.
* Chemical conservation of monuments and heritage sites abroad.
* Technical assistance to state protected monuments as well as built cultural heritage under the control of trusts in the form of deposit works.
* To impart training on chemical conservation to the students of Post Graduated Diploma in Archaeology, from Institute of Archaeology, New Delhi.

* To organize awareness programme and workshops /seminars with regard to scientific conservation works

श्री.मॅनेजर सिंग यांचे वरील भेटीदरम्यान श्री साईबाबा मंदिर, व्दारकामाई, चावडी व दिक्षितवाडा या इमारतींना त्यांनी सुचविलेल्या रासायनिक प्रक्रीयेव्दारे कोटींग करण्याचे कामाबाबत पुढील कार्यवाहीसंबंधी चर्चा करण्यात आली. त्यावेळी त्यांनी खालिल माहिती दिली.

०१. ASI यांचेमार्फत प्रथम नियोजीत कामाची मोजमापे घेऊन एस्टीमेट तयार करुन देण्यात येईल.

०२. एस्टीमेट मंजूर झाल्यानंतर प्रत्यक्ष काम ASI यांचेमार्फत करावयाचे झाल्यास ते डिपॉझिट वर्कचे स्वरुपात करणेत येईल. त्यासाठी सुमारे २४ ते २५% चार्जेस ASI यांना अदा करावे लागतील.

०३. जर काम दुसऱ्या संस्थेमार्फत करावयाचे असल्यास ASI यांचेमार्फत सुपरव्हीजन करण्यात येईल.

०४. यासाठी ASI यांचे प्रमुख श्री. प्रविण श्रीवास्तव, डायरेक्टर जनरल, नवी दिल्ली यांचेशी प्रथम दूरध्वनीवर चर्चा करुन त्यांना विनंती पत्र पाठविल्यास पुढील कामकाजास गती मिळेल.

याबाबत प्रथम ASI यांचेमार्फत कामाची सविस्तर रुपरेषा ठरवून त्याचे एस्टीमेट तयार करुन मिळणेविषयी मा. डायरेक्टर जनरल, ASI नवी दिल्ली यांना विनंती करता येईल.

तरी उपरोक्तप्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८५९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी व दिक्षितवाडा या इमारतींना रासायनिक प्रक्रियेव्दारे कोटींग करण्याचे कामासाठी ASI यांचेमार्फत कामाचा सविस्तर रुपरेषा ठरवून प्रस्ताव मागविणेत यावा. त्यासाठी मा.डायरेक्टर जनरल, ASI, नवी दिल्ली यांना मा.कार्यकारी अधिकारी यांचेमार्फत विनंती पत्र पाठविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०७** **नविन स्टाफ क्वार्टर सबस्टेशन परिसरामध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे व Metering Cubical करीता शेडची उभारणी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** निमगांव कोऱ्हाळे शिवारामध्ये संस्थान मालकीचे सर्व्हे नं.१६९ मध्ये संस्थान कर्मचाऱ्यांकरीता नविन स्टाफ क्वार्टर इमारती बांधण्यात आलेल्या आहेत. सदर स्टाफ क्वार्टर करीता इमारतीचे वीज पुरवठाकरीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून उच्च दाब वीजपुरवठा जोडून घेण्यात आलेला आहे. त्यामुळे त्याठिकाणी सबस्टेशनमध्ये Two pole structure, transformer व Metering cubical यांची उभारणी करण्यात आलेली आहे.

दि.२६/०४/२०१३ रोजीचे पत्रान्वये सहाय्यक अभियंता, MSEDC Ltd, राहाता यांनी सबस्टेशन परिसरात पेव्हींग ब्लॉक बसविणेस व Metering Cubical करीता शेड करणेस सूचविले आहे. याबाबत दि.०५/०६/२०१३ रोजीचे पत्रान्वये विद्युत विभागाने कळविले आहे.

सबस्टेशन परिसरामध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणे व Metering Cubical करीता शेड तयार करणे याकामी अंदाजीत खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | कामाचा तपशिल | अंदाजीत खर्च |
|---|---|---|
| ०१ | सबस्टेशनकरीता पेव्हींग ब्लॉक बसविणे | १,६१,५६०/- |
| ०२ | Metering Cubical करीता शेड तयार करणे | ९,८५०/- |
| | **एकूण रुपये** | **१,७१,४१०/-** |

उपरोक्त कामापैकी शेड बनविणेचे काम विभागामार्फत करुन घेता येईल. याकामी विद्युत विभागामार्फत स्ट्रक्चर तयार करुन बांधकाम विभागामार्फत त्यावर पत्रे बसविणेचे काम करता येईल. तसेच पेव्हींग ब्लॉक बसविणेचे कामासाठी विहीत पध्दतीने कोटेशन मागवून काम पूर्ण करुन घेता येईल.

तरी वर्ग चार कर्मचारी निवासस्थान येथील सबस्टेशन भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणे व Metering cubical करीता शेड करणेसाठी येणारे अंदाजे रक्कम रु.१,७१,४१०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेले कामासाठी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या रु.१,७१,४१०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०८** **दिवाळी सुट्टी निमित्त होणारे गर्दीचे कालावधीमध्ये मंडप व्यवस्था करणेबाबत.**

**प्रस्ताव-** दिनांक ०३ नोव्हेंबर,२०१३ ते दि. १७ नोव्हेंबर, २०१३ अखेर १५ दिवस दिपावली सणानिमीत्त शैक्षणिक व इतर कार्यालयांना सुट्या आहेत. याकालावधीत साईभक्तांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्याने, साईभक्तांचे सोयीसाठी तात्पुरते निवास व्यवस्थेकरीता खालील ठिकाणी एम.एस. पाईपचे स्ट्रक्चर असलेले कापडी ताडपत्रीचे छताचे मंडप, टाकणे आवश्यक आहे.

| अ. नं. | तपशिल / ठिकाण | साईज | एकुण चौ. फुट |
|---|---|---|---|
| ०१ | लाडू विक्री काउंटर समोर | ३०'x६०' | १८००.०० |
| ०२ | समाधी मंदिरासमोर सभाकुंड येथे | ६१'x६१' | ३७२१.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ०३ | उदी काऊंटर | १८'x४६' | ८२८.०० |
| **एकुण चौ. फुट** | | | **६३४९.००** |

उपरोक्त प्रमाणे दिपावली सुट्टयांचे कालावधीत एम.एस.पाईपचे स्ट्रक्चर असलेले कापडी ताडपत्रीचे छत असलेले मंडप व्यवस्था करणेकामी अंदाजे रु.२,००,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तसेच ऐनवेळी वाढणाऱ्या मंडपास अतिरिक्त खर्च अपेक्षीत आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि. १६.०३.२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २६६ अन्वये दोन किंवा अधिक सुट्यांचे कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी संस्थानचे मोकळ्या जागेत आवश्यक तेथे कापडी / शामियाना मंडप उभारणी करणेस व याकामी येणारे खर्चास मान्यता देणेत आलेली आहे.

तरी सदरहू कामी अशा प्रकारचे काम करणारे खालील मंडप ठेकेदार यांचेकडून दरपत्रके मागविता येतिल.

| अ. नं. | मंडप फर्मचे नांव | अ. नं. | मंडप फर्मचे नांव |
|---|---|---|---|
| ०१. | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर | ०८ | बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर |
| ०२. | झुराळे टेन्ट मंडप डेकोरेटर्स, निमगांव खैरी | ०९. | प्रकाश मंडप डेकोरेटर्स, वैजापूर |
| ०३. | श्री. भिमराज भागुजी गाडेकर, राहाता | १०. | स्वस्तिक मंडप वर्क्स, अहमदनगर |
| ०४. | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर | ११. | जोंधळे मंडप डेकोरेटर्स, कोकणगांव (संगमनेर) |
| ०५. | शर्मा मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, वैजापूर | १२. | लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर |
| ०६. | कल्याणी टेन्ट हाऊस, नांदुर | १३. | साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूर |
| ०७. | बालाजी मंडप ॲण्ड डेकोरेटर्स, मनमाड | १४. | कला साधना डेकोरेटर्स, नाशिक |

तरी उपरोक्त मंडप व्यवस्था करणेसाठी अपेक्षित रु.२,००,०००/- मात्रचे अंदाजे खर्चास तसेच याकामी वरीलप्रमाणे मंडप ठेकेदारांकडून कोटेशन्स मागवून सदरहू काम करुन घेण्यास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दिवाळी सुट्टी निमित्त होणारे गर्दीचे कालावधीमध्ये साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व्यवस्था करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या रु.२,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०९** **सन २०१३- १४ करीता मेडीमिक्स साबण (१२ ग्रॅम वडी) खरेदीस आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** द्वारावती निवासस्थान विभागामधील सर्व खोल्यांचे वॉश बेसीनवर मेडीमिक्स साबण ठेवणेकरीता सन २०१३ - १४ (ऑगष्ट २०१३ ते मार्च २०१४) या ८ महिन्याचे कालावधीसाठी मेडिमिक्स साबण ( १२ ग्रॅम वडी ) ७५८४० नग खरेदीकामी दि.२६/०७/२०१३ चे मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेतील निर्णय क्रं.५८५ नुसार पुरवठाधारकांकडून दरपत्रके मागणी करुन खरेदी करणेस व येणा-या अंदाजे रु.१,७०,०००/-चे खर्चाचे प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार जा.नं.एसएसएसटी/ वशी-द्वारावती/ २४४४/ २०१३ दि.२४/०८/२०१३ अन्वये पुरवठाधाकांकडून दरपत्रकांची मागणी करण्यात आलेली आहे. प्राप्त झालेले सर्व दरपत्रके दि.१२/०९/२०१३ रोजी मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षात समक्ष उघडण्यात आले.त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.नं | दरपत्रक धारकाचे नाव | मालाचे वर्णन व मागणी | दरपत्रकात नमुद केलेली सर्व करांसह दर प्रती नग | | एकूण रक्कम रूपये | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | रुपये | पैसे | रुपये | पैसे |
| १ | बाफना जनरल स्टोअर्स, शिर्डी | मेडिमिक्स साबण (१२ ग्रॅम वडी) ७५८४० नग | **२** | **००** | **१,५१,६८०** | **००** |
| २ | सचिन जनरल स्टोअर्स, शिर्डी | | २ | १४.८७ | १,६२,९६१ | ०० |
| ३ | मे. भार्गव एजन्सी, पुणे | | २ | १८ | १,६५,३३१ | २० |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचा विचार करता अ.नं.०१, बाफना जनरल स्टोअर्स,शिर्डी यांचे प्रती वडी दर रु.२.०० मात्र हे दर न्युनतम असल्याने त्यांना उपरोक्त मालाचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.याकामी रु.१,५१,६८०/- खर्च आलेला असून त्यास कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.८६२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, व्दारावती निवासस्थान)

---

**विषय नं.१०** **साईप्रसाद निवासस्थान विभागाकडील बंद असलेली निवासस्थाने सुरु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीरामनवमी उत्सव २०१३ चे आढावा बैठकीमध्ये मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी सुचीत केल्याप्रमाणे साईआश्रम भाग ०१ साईभक्तांचे निवासासाठी सुरु करावयाचा असलेने तथा पाणी टंचाईमुळे साईप्रसाद निवासस्थान विभागाकडील साईप्रसाद नं.०१ व ०२, साई उद्यान, सेवाधाम, शांतीनिकेतन इ. भक्तनिवासस्थाने दिनांक ११/०४/२०१३ पासून बंद करण्यात आली आहेत. बंद करण्यात आलेल्या इमारतींची सविस्तर माहिती सोबत जोडलेल्या तक्त्यात नमुद केलेली आहे.

पाणीटंचाईमुळे उपरोक्त बंद करण्यात आलेल्या २७४ खोल्या, १२ हॉल्स व ९९ लॉकर्स या मधून वापरण्यात येणारे पाणी साईआश्रम भाग ०१ कडील इमारतींमध्ये वापरुन संस्थानचा १५०० खोल्यांचा नवीन साईआश्रम भाग ०१ प्रकल्प दिनांक ११/०४/२०१३ पासून सुरु करावा व त्याकरिता साईप्रसाद निवासस्थान विभागाकडील कर्मचारी साईआश्रम भाग ०१ कडे वर्ग करावेत असे ठरले होते

त्या अनुषंगाने दिनांक १०-११/०४/२०१३ पासून साईप्रसाद निवासस्थान विभागाकडील उपरोक्त निवासस्थाने साईभक्तांना देणेचे बंद करण्यात आलेले आहे. सदरील निवासस्थाने बंद करण्याबाबत मा.व्यवस्थापन समिती सभेत कुठलाही ठराव / निर्णय झालेला नसून उपरोक्त बदलाची माहीती साईभक्तांपर्यंत पोहचावी याकरिता बोर्ड लावण्यास तथा प्रसारमाध्यमे / वृत्तपत्राद्वारे प्रसिद्धी करणेस इकडील विभागाची दि. ०५/०४/२०१३ रोजीची टिपणी अन्वये मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांची मान्यता घेण्यात आली व त्यानुसार ठिक-ठिकाणी माहितीचे बोर्ड लावले असून जनसंपर्क कार्यालयामार्फत वृत्तपत्रातून प्रसिद्धी देण्यात आली असून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

साईप्रसाद निवासस्थान विभागाकडील एकूण ६७ कर्मचाऱ्यांपैकी वरिष्ठ लिपीक - ०३, लिपीक - टंकलेखक - ०३ व मदतनीस - ०८ अशा एकूण - १४ कर्मचाऱ्यांच्या बदल्या साईआश्रम भाग ०१ कडे करण्यात आल्या, उर्वरित ५३ कर्मचारी पैकी ३८ कर्मचाऱ्यांच्या संस्थानच्या इतर विभागांकडे बदल्या करण्यात आलेल्या आहेत. साईप्रसाद निवासस्थान विभागाकडील साईनिवास अतिथीगृह व जनसंपर्क कार्यालयाजवळील बैठक कक्ष सुरु असलेने त्याकरिता उर्वरित १५ कर्मचारी कार्यरत आहेत.

उपरोक्त भक्तनिवासस्थानांमध्ये असलेले कॉट्स, बॉक्स गाद्या, बेडशीट, चादर, गादी कव्हर इ. साहित्य वरिष्ठांच्या मान्यतेने वेळोवेळी संस्थानच्या इतर विभागांकडे मागणीनुसार वर्ग करण्यात आलेले आहेत व त्यांच्या नोंदीही साईप्रसाद निवासस्थान विभागाचे डेडस्टॉक मधून कमी केलेल्या आहेत. साईआश्रम ०२ कडे वर्ग केलेले कॉट्स व बॉक्स गाद्यांपैकी कॉट्स साईभक्तांच्या वापरात असून फक्त बॉक्स गाद्या तेथे पडून आहेत.

साईभक्तांचे निवासासाठी साईआश्रम भाग ०१ व साई आश्रम भाग ०२ अशी दोन सुसज्ज निवासस्थाने बांधण्यात आली असून साईआश्रम भाग ०१ मध्ये १५०० खोल्यांमधून व साई आश्रम भाग ०२ कडील १६० हॉल्समध्ये साईभक्तांचे निवासासाठी व्यवस्था करण्यात आलेली आहे. या व्यतिरीक्त साईबाबा भक्त निवासस्थान इमारतीमध्येही साईभक्तांची राहण्याची व्यवस्था होत आहे.

साईप्रसाद नं.०१ व ०२, साई उद्यान, सेवाधाम, शांतीनिकेतन इ. भक्तनिवासस्थान मिळून २७४ खोल्या, १२ हॉल्स व ९९ लॉकर आहेत. त्यांमध्ये प्रतिदिनी २६२६ एवढया साईभक्तांची निवासाची सोय होत होती.

दिनांक ०४/१०/२०१३ रोजी शिर्डी येथील जय बाबा या स्थानिक वृत्तपत्रातून च्साईप्रसाद भक्तनिवास पुन्हा सुरु कराछ अशी बातमी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

साईप्रसाद निवासस्थान विभागाकडील बंद करण्यात आलेली भक्तनिवासस्थाने पुन्हा सुरु करणेसाठी खालील बाबींची प्रथम पुर्तता करावी लागेल.

०१. सदरचे निवासस्थान सुरु करणेकामी साईप्रसाद निवासस्थान विभागाला अधिक्षक - ०१, व.लिपीक - ०४, लिपीक टंकलेखक - ०९, मदतनीस - ४५ असे एकूण कायम कर्मचारी ५९ व कंत्राटी कर्मचारी ३४ असे एकूण ९३ कर्मचाऱ्यांची पुर्तता करावी लागेल.

०२. उपरोक्त बंद असलेल्या निवासस्थानांची साफ-सफाई आरोग्य विभागाचे कर्मचाऱ्यांमार्फत करण्यात येत होती. त्याकरिता आरोग्य विभागास एकूण २९ कर्मचाऱ्यांची आवश्यकता भासणार आहे.

०३. उपरोक्त निवासस्थाने बंद करण्यात आल्यामुळे सदरील निवासस्थांमध्ये एकूण असलेले कॉट्स - ४६९ नग साई आश्रम भाग ०२ कडे वाहून नेणे व तेथील हॉल्समध्ये टाकणे करिता रुपये ३०,०००/- मात्रचा खर्च हमाली पोटी देण्यात आलेला आहे. सदरील कॉट्सचा साईभक्तांकरिता वापर सुरु आहे. तसेच उपरोक्त कॉट्स वरील बॉक्स गाद्या एकूण ४४६ नग साई आश्रम भाग ०२ कडील उपलब्ध कर्मचाऱ्यामार्फत तिकडे साईभक्तांच्या वापराकरिता नेण्यात आलेल्या आहेत. सदरील कॉट्स व गाद्या पुन्हा इकडील विभागाकडे आणणेकरिता हमाली व वहातूक खर्च अंदाजे रक्कम रु. ४०,०००/- मात्र अपेक्षित आहे.

०४. साईप्रसाद निवासस्थान विभागाकडे नव्याने उपलब्ध असलेले बेडशीट, चादर,गादी कव्हर इ. स्टॉक उपरोक्त निवासस्थाने बंद करण्यात आल्यामुळे साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाला बेडशीट - २००० नग, गादी कव्हर - १००० नग व साई आश्रम भाग ०१ कडे चादरी २३०० नग वर्ग करण्यात

आलेल्या आहेत. बंद करण्यात आलेली निवासस्थाने पुर्ववत सुरु करणेकामी इतर निवासस्थानांकडून बेडशीट - ३००० नग, चादर - ३००० नग , गादी कव्हर - १५०० नग इ. ची उपलब्धता करुन घ्यावी लागेल. अन्यथा नव्याने खरेदी करावी लागतील.

०५. उपरोक्त निवासस्थाने बंद करण्यात आल्यामुळे सन २०१३ - १४ चे वार्षीक खरेदी करिता खरेदी विभागास साईप्रसाद निवासस्थान विभागाने मागणी केलेले रुम नोंद रजिस्टर, रुम बुकिंग पावत्या, भक्त नाव नोंदणी फॉर्म इ. मागणी नको असले बाबत कळविण्यात आलेले आहे त्याची पुन्हा खरेदी विभागामार्फत खरेदी करावी लागेल.

०६. पाणी पुरवठा विभागाने बंद करण्यात आलेल्या निवासस्थानांना वापरासाठी पाणी पुरावयाचे झाल्यास सद्य स्थितीत माहे फेब्रूवारी २०१४ पर्यंत पाणी पुरवठा करणे शक्य आहे. परंतू त्यानंतर संस्थान साठवण तलावास जलसंपदा विभागाकडून करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठा कालावधीत (रोटेशन कालावधी) वाढ होण्याची शक्यता असल्याने संस्थान पाणी वापर यंत्रणेवर ताण पडण्याची शक्यता आहे. जलसंपदा विभागाकडून रोटेशन कालावधीत वाढ झाल्यास आपणास पुर्ववत पाण्याचे नियोजन काटकसरीने करावे लागेल असे त्यांनी दि. ०९/१०/२०१३ चे पत्रान्वये कळविले आहे.

याशिवाय विद्युत विभाग, बांधकाम विभाग, आय.टी.विभाग, इ विभागांकडून आवश्यकता भासल्यास कर्मचारी बोलावून निवासस्थानांतील तक्रारीचे निवारण करुन घेतले जाते.

तरी साईप्रसाद निवासस्थान विभागाकडील बंद करण्यात आलेली भक्तनिवासस्थाने साईभक्ताचे निवासासाठी पुन्हा सुरु करावी किंवा कसे? या बाबत सदरचा प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेत चर्चा होऊन निर्णय होणेस्तव, सादर

**निर्णय क्र.८६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, पाणीटंचाईमुळे साईप्रसाद निवासस्थान विभागाकडील बंद करण्यात आलेली निवासस्थाने त्वरीत पुर्ववत सुरु करण्यात यावी. त्याकामी उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेल्या बाबीस मान्यता देण्यात आली.**

**तसेच त्यासाठी यापुर्वी आकारण्यात येणारा सेवा आकार कायम ठेवण्यात यावा, असे ठरले.**(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान/ अधिक्षक, सामान्य प्रशासन/ कामगार अधिकारी)

-------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.११** **खाजगी सभा, मेळावे, ट्रिप आयोजकांनी पैसे घेऊन आयोजन केलेल्या ट्रिपच्या भक्तांचे मोफत निवासव्यवस्थेबाबत.**

**प्रस्ताव-** **प्रस्ताविक:-** साई धर्मशाळेमध्ये पालखी पदयात्री व्यतिरिक्त सहली, खेळाडू (राष्ट्रीय स्पोर्टस् ॲरोबिक्स स्पर्धा), बार असोशिएशन् गृप, जैन श्रावक संघ, महाराष्ट्र राज्य ग्राहक सेवा कर्मचारी संघटना (विविध जिल्ह्यातील) व मेळावे इ. प्रकारचे विविध क्षेत्रातील व्यक्तींकडून निवासव्यवस्थेसाठी पत्रव्यवहार झालेले आहेत व काही होत आहेत.

मागणी:- मुख्यत: स्पर्धा, सभा आयोजन, गुरुदर्शन, मेळावे, खेळ इ. कार्यक्रम इतरत्र आयोजित केलेले असतात. परंतु निवास मात्र संस्थानचे साई धर्मशाळेत करीत असतात.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक,कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** साई धर्मशाळा हा विभाग दिनांक १८/०७/२०१३ पासुन नवीन सुरु करण्यात आलेला आहे. साई धर्मशाळेमध्ये एकूण ६ इमारती असून एकूण १९२ हॉल आहेत. त्यापैकी **डी** इमारतीमध्ये श्री साईबाबा संस्थान संचलित, कनिष्ठ महाविद्यालय सुरु करण्यात आलेले आहे. त्यामुळे सध्या पाच इमारती मिळून एकूण १६० हॉल साईभक्तांच्या निवासव्यवस्थेसाठी वापरण्यात येत आहेत.

या ठिकाणी शक्यतो पालखीधारक, पदयात्री यांतील सहभागी साईभक्तांची निवासव्यवस्था करण्यात येते. एका हॉलमध्ये कमीत कमी अठरा (१८) ते जास्तीत जास्त चाळीस (४०) साईभक्तांची निवासव्यवस्था करण्यात येते. आता या ठिकाणी हॉल असल्यामुळे पालखी, पदयात्री व्यतिरिक्त सहली, खेळाडू (राष्ट्रीय स्पोर्टस् ॲरोबिक्स स्पर्धा), बार असोशिएशन्चा गृप, जैन श्रावक संघ, महाराष्ट्र राज्य ग्राहक सेवा कर्मचारी संघटना (विविध जिल्ह्यातील) खेळ व मेळावे इ. प्रकारचे विविध क्षेत्रातील व्यक्तींकडून धर्मशाळेकडे निवासव्यवस्थेसाठी पत्रव्यवहार झालेला आहे व होत आहे. यात मुख्यत: स्पर्धा, सभा आयोजन, गुरुदर्शन, खेळ, मेळावे इ. कार्यक्रम इतरत्र खाजगी ठिकाणी आयोजित केलेले असतात. परंतु निवास मात्र संस्थानचे साई धर्मशाळेत करीत असतात. अशा प्रकारे वरील प्रकारचे कार्यक्रमाचे बाहेर नियोजन व निवासव्यवस्था धर्मशाळेमध्ये केल्यास त्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

आतापर्यंत उपरोक्त दर्शविलेनुसार ची (कार्यक्रम इतरत्र व निवास मात्र संस्थान धर्मशाळेमध्ये) माहिती खालीलप्रमाणे-

| अ. क्र. | दिनांक | नाव | आलेली संख्या | दिलेले हॉल | कार्यक्रम - ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| **०१** | ०६/०९/२०१३ | बार असोशिएशन् ॲडव्होकेट (मथुरा) | ४०० | १७ | खाजगी सभा |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **०२** | २१/०९/२०१३ | वर्धमान जैन श्रावक संघ, शिर्डी | १४० | ०८ | गुरुदर्शन (जैन मंदिर, शिर्डी) |
| **०३** | २६/०९/२०१३ | विजय मेडिकल स्टोअर्स, शिर्डी | १२५ | ०७ | गुरुदर्शन (जैन मंदिर, शिर्डी) |
| **०४** | ३०/०८/२०१३ ते ०१/०९/२०१३ | राष्ट्रीय स्पोर्टस् एरोबिक्स स्पर्धा, पुणे | ६०० | १५ | खेळांच्या स्पर्धा (साईनिवारा, निमगावं) |
| **०५** | ०५/१०/२०१३ ते ०६/१०/२०१३ | महाराष्ट्र राज्य ग्राम रोजगार सेवक कर्मचारी संघटना, नांदुर्खी खु. | ११९० | ३१ | खाजगी सभा (साईनिवारा, निमगावं) |
| **०६** | २१/१०/२०१३ ते ३१/१०/२०१३ | डॉ.पद्मावती, डायरेक्टर, शिवा शक्ती शिर्डी साई अनुग्रह महापीठम, हैद्राबाद | २०० | येणार | सिल्व्हर ओक, शिर्डी (खाजगी कार्यक्रम होणे आहे.) |

दिनांक २७/०८/२०१३ चे टिपणीत प्रशासकीय अधिकारी यांनी रुम भाडे पावती ऐवजी उतरणाऱ्या सहली वगैरेंकडून प्रति भक्त ठराविक रकमेची एकत्रित देणगी पावती घेतल्यास योग्य होईल, असे मत आहे. तथापि, सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीपुढे निर्णयार्थ ठेवावा, असे मत आहे असे नमूद केले होते. त्यावर मा. कार्यकारी अधिकारी सो. यांनी देणगी काऊंटर सुरु करावे असे निर्देश दिले होते. सदरच्या मंजूर टिपणीची प्रत मुख्य लेखाधिकारी, शिर्डी यांना दि. ३१/०८/२०१३ रोजी दिली होती.तथापि, संबंधित विभागांनी त्यावर कोणतीही कार्यवाही केलेली दिसत नाही. दिनांक २५/०८/२०१३ रोजी श्री. जनक पुरुषोत्तम टेलर (सुरत), गुजरात यांनी भक्तांकडून प्रवास, भोजन व निवास व्यवस्थेपोटी प्रत्येकी रु. ८००/- घेऊन शिर्डी, औरंगाबाद, वेरुळ, दौलताबाद अशी सहल आयोजित केले. परंतू आपले तर्फे मोफत निवासस्थान घेतले.

तथापि, शिर्डीत दि. २५/०८/२०१३ रोजी विनामुल्य निवासस्थान व्यवस्था घेतली. तसेच २) श्री. सुरेशकुमार गोंचाला, शिर्डी यांनी संस्थानकडे दिनांक २६/०८/२०१३ रोजी दिनांक २७/०८/२०१३ रोजी श्री. एम. व्ही. व्ही. मल्लिकार्जुनुडू (हसनबाडा), आंध्रप्रदेश यांचेसाठी निवास व्यवस्थेसाठी अर्ज दिलेला आहे.

श्री. एम. व्ही. व्ही. मल्लिकार्जुनुडू (हसनबाडा), आंध्रप्रदेश यांचेकडे चौकशी केली असता, तेथील ३३० साईभक्तांची दर्शनाची, निवासाची तसेच भोजनाची व्यवस्था रु. १,२००/- घेतले असून या १,२००/- रुपयामध्ये त्यांनी प्रवास, भोजन व निवासव्यवस्था करण्यात आली आहे असे सांगितले. उपरोक्त भक्तांची साई धर्मशाळा येथे दि. २५/०८/२०१३ व २७/०८/२०१३ रोजी निवासव्यवस्था करण्यात आली होती. (निवासस्थान मोफत घेतले, परंतु आयोजकांनी पॅसेंजर कडून निवासाचे पैसे घेतले आहेत.)

उपरोक्त दोन उदाहरणांवरुन असे दिसून येते की, विविध मंडळे, संस्था ह्या ट्रिपा, मेळावे आयोजित करुन प्रत्येक साईभक्तांकडून निवास, भोजन व प्रवासापोटी रक्कम जमा करुन घेत असतात.

तसेच अ. क्र. २ व ३ मधील दि. २१/०९/२०१३ व दि. २६/०९/२०१३ रोजी साई धर्मशाळा येथे निवासासाठी आलेले भक्त हे शिर्डी येथील जैन स्थानकामध्ये आलेल्या महंताच्या दर्शनासाठी म्हणून आलेले होते. त्यांचा मुळ उद्देश जैन महंतांचे दर्शन हा होता. अ. क्र. ४ व ५ मध्ये दर्शविलेल्या पत्रलेखकाचा मुळ उद्देश हा प्रथमतः खेळाच्या स्पर्धा व सभा असा अनुक्रमे होता. अ. क्र. २ ते ५ हे उपरोक्त दर्शविलेल्या काळामध्ये साई धर्मशाळेमध्ये निवासासाठी उतरलेले होते.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मतः-** १) मोफत निवास व्यवस्था असल्यामुळे स्पर्धा, सभा आयोजन, गुरुदर्शन, मेळावे इ. कार्यक्रम शिर्डी परिसरात किंवा इतरत्र करणे व मोफत निवासासाठी मात्र संस्थानचे साई धर्मशाळेमध्ये घेणे. आता ही बाब वाढत चालली आहे. मेळावे, कर्मचारी संघटना सभा, भाडे नसल्यामुळे अधिक दोन दिवसांपेक्षा जास्त म्हणजे आठ ते दहा दिवस निवासस्थानची मागणी करतात. अशा संस्था अथवा व्यक्ती यांची व्यवस्था साई धर्मशाळेमध्ये करु नये. जेणेकरुन ही प्रथा कायम पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. जर अशा खाजगी कार्यक्रमासाठी निवासव्यवस्था आपण केली तर इतर पदयात्री तसेच पालखीधारकातील सहभागी साईभक्तांची गैरसोय होईल. याबाबत ज्या त्यावेळची परिस्थिती पाहून म्हणजे साईभक्तांची गर्दी इ. पाहून विभागप्रमुख यांनी वरिष्ठांचे सल्लामसलतीने जास्तीत जास्त एक ते दोन दिवस संबंधीतांची निवास व्यवस्थेविषयी नियोजन करता येईल. तसेच संबंधितांकडून प्रति दिनी दरडोई रु. ५०/- मात्र दर आकारुन रकमेची देणगी पावती करुन घेता येईल, असे नम्र मत आहे.

२) पालखीधारक / पदयात्री आलेस त्यांचेकडून त्या त्या ठिकाणी मुक्काम केल्याच्या तेथील सरपंचाचे पत्र बाबतची छाननी करुन त्यांची संस्थान नियमानुसार एक किंवा दोन दिवस मोफत निवासव्यवस्था करण्यात येते, तथापि या व्यतिरिक्त वरील प्रकारची मागणी आल्यास म्हणजे कार्यक्रम इतरत्र करणे व निवासव्यवस्था मात्र संस्थानचे साई धर्मशाळेमध्ये करणे तशी ट्रिप आयोजक यांचेकडून निवासासाठी मागणी आल्याचे दिसून आलेस संबंधितांकडून दरडोई प्रतिदिन रु. ५०/- मात्र ची देणगी पावती करुन नंतरच हॉल देता येतील व त्याबाबत तशी कल्पना संबंधितांना देता येईल.

यावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणेसाठी सदरचा विषय मा. त्रिसदस्यीय समितीपुढे मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.८६४ यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम धर्मशाळा येथे पालखी- पदयात्री, शैक्षणिक सहली, संस्थान रुग्णालयांमधील रुग्णांचे नातेवाईक यांची मोफत निवासव्यवस्था करणेत यावी.**

**तसेच, याव्यतिरिक्त निवासासाठी येणारे दर्शनार्थी, क्रिडा स्पर्धा, सभा आयोजन, गुरुदर्शन, मेळावे, ट्रिप आयोजकांनी पैसे घेऊन आयोजन केलेले ट्रिपधारक इत्यादींची साईआश्रम धर्मशाळा येथे दि.२५.०८.२०१२ चे सभेतील निर्णय क्र.७०२ अन्वये ठरलेल्या सेवाआकाराची रक्कम देणगी शुल्क म्हणून आकारणेत येऊन निवासव्यवस्था करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम धर्मशाळा)

---

**विषय नं.१२ श्री साईबाबा संस्थानचे साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे हेड गॅस किट बदली करणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीच्या (०१) मंदिर परीसर, (०२) साईबाबा भक्तनिवासस्थान, (०३) रुग्णालय + साईनगर, (४) नविन धर्मशाळा (०५) नविन स्टाफ क्वार्टर (०६) श्री साई प्रसादालय (०७) साई आश्रम भाग-०१ (०८) साई आश्रम भाग-०२ व (०९) साई आश्रम भाग-०१ ए.सी. या नऊ वेगवेगळ्या ठिकाणी म.रा.विद्युत वितरण कंपनीचा वीज पुरवठा खंडीत झाल्यानंतर पर्यायी तातडीच्या विद्युत पुरवठयाकामी प्रत्येक ठिकाणी डिझेल जनसेटस् बसविण्यात आलेले आहेत. अहमदनगर, नाशिक, जळगांव व औरंगाबाद जिल्हयाकरीता कमिन्स सेल्स ॲण्ड सर्व्हिस इंडिया लि.चे मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, नाशिक हे मे.कमिन्स यांचे अहमदनगर, नाशिक, जळगांव व औरंगाबाद जिल्हयाकरीता एकमेव कंपनी मान्यताप्राप्त अधिकृत सर्व्हिस डिलर आहेत. सोबत मे.कमिन्स इंडिया लि., पुणे यांचे दि.११-०३-२०११ चे पत्र जोडले आहे.

मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, नाशिक यांचा इंजिनिअर दरमहा येऊन सर्व्हिसिंग करत असतो. या महिन्यात जनरेटरसेटच्या दर महिन्याच्या एएमसी व्हीजीट करीता त्यांचा प्रतिनिधी आला असता नविन भक्तनिवासस्थान ५०० केव्हीए जनसेट या इंजिनचे हेड गॅस कीट सेटमधून ऑईल लिकेज असल्याचे आढळून आले आहे. तरी सदर इंजिनचे हेड गॅस कीट बदली करणे गरजेचे आहे.

याकरीता जनसेटच्या कमिन्स कंपनीचे अधिकृत सर्व्हिस डिलर, मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, नाशिक यांनी कोटेशन पाठविलेले आहेत. त्यासाठी खालीलप्रमाणे खर्च येणार आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

**०१)** नविन भक्तनिवासस्थान (५०० रुम) ५०० के.व्ही.ए. जनसेट इंजिन नं. ईएसनएन २५२४२३१७ मॉडेल व्हीटीए-२८-जी.

| Sr.No. | Part No. | Particulers | Qty | Price | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01) | 4089360 | SET, UPPER ENGINE GASKET | 01 | 1,21,494.99 | 1,21,495.00 |
| 02) | 206576 | GASKET, TURBOCHARGER | 01 | 232.18 | 232..10 |
| 03) | 219138 | NUT, REGULAR HEXAGON | 01 | 31.79 | 31.70 |
| 04) | 3519763 | GASKET, TRBOCHARGER | 02 | 19.39 | 38.70 |
| 05) | 3031715 | CONNECTION, TUR OIL DRAIN | 02 | 484.84 | 969.60 |
| 06) | 216487 | GASKET, CONNECTION | 02 | 389.24 | 778.40 |
| 07) | 254608 | GASKET, BREATHER | 01 | 340.44 | 340.40 |
| 08) | 193736 | SEAL, O RING | 40 | 43.83 | 1753.40 |
| 09) | 165006 | SCREW, HEXAGON HEAD CAP | 24 | 101.36 | 2432.60 |
| 10) | 168306 | SCREW, SLOTTED SET | 06 | 448.60 | 2691.60 |
| 11) | S212 | NUT, REGULAR HEXAGON | 06 | 10.84 | 65.00 |
| 12) | 69203 | SEAL, O RING | 02 | 41.07 | 82.10 |
| 13) | 122981 | SEAL, O RING | 02 | 73.00 | 146.00 |
| 14) | 3010157 | SEAL, O RING | 02 | 72.36 | 144.70 |
| 15) | 2017147 | GASKET, WTR CONNECTION | 01 | 30.41 | 30.40 |
| 16) | 3167218 | INHIBITOR, CORROSION | 03 | 3508.61 | 10525.80 |
| 17) | 3873355 | CONNECTION, WATER OUTLET | 01 | 585.23 | 585.20 |
| 18) | 3033215 | GASKET, THEROSTAT HOUSING | 06 | 19.35 | 116.10 |
| 19) | 3030787 | HOSE, HUMP | 02 | 266.56 | 533.10 |
| 20) | 4056443 | HOSE, PLAIN | 02 | 604.49 | 1208.90 |
| 21) | 3872281 | RING SEALING 1" | 02 | 37.85 | 75.70 |
| 22) | 3872255 | RUBBER RING 1.25 | 02 | 52.91 | 105.80 |
| 23) | 1139214 | GASKET, CONNECTION | 02 | 11.14 | 22.20 |
| 24) | 3872297 | RUBBER RING 2.1/2 | 02 | 88.88 | 177.70 |
| 25) | 113000154 | FREIGHT CHARGES | 01 | 2500.00 | 2500.00 |
| | | | | Total | 1,47,082.90 |
| | | ADD VALUE ADDED TAX .5% ITEM No.20 | | | 60.40 |
| | | ADD VALUE ADDED TAX .12.5% OTHER ITEM | | | 18,234.20 |
| | | (A) TOTAL AMOUNT : | | | **1,65,377.00** |
| **(B)** | | SERVICE CHARGES – BREAK DOWN LABOUR CARGES – HEAD , PUMP, INJECTOR TURBO REMOVAL- | | | 40,000.00 |
| | | | SERVICE TAX 12% | | 4,800.00 |
| | | | CESS ON SERVICE TAX 2% | | 96.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | HIGHER EDU.CESS ON SERVICE TAX 1% | 48.00 |
| | | | (B) TOTAL AMOUNT : | 44,944.00 |
| | | | A + B TOTAL AMOUNT RS. | **2,10,321.00** |

तरी वरीलप्रमाणे श्री साईबाबा संस्थानचे साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम ) येथील स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे हेड गॅस कीट कमिन्स कंपनीचे अधिकृत सर्व्हिस डिलर, मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, नाशिक यांचेकडून घेणेस व त्यासाठी रक्कम **रुपये २,१०,३२१.००** मात्र खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८६५ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) मधील स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे हेड गॅस किट बदली करणेकामी कमिन्स कंपनीचे अधिकृत सर्व्हिस डिलर, मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, नाशिक यांचेकडून करुन घेणेस व त्यासाठी येणा-या रु.२,१०,३२१/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१३ सिलंबद केलेल्या महारतन गावरान तुपाबाबत.**

**निर्णय क्र.८६६ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक, भांडार विभाग)

---

**विषय नं.१४ प्रशिक्षणार्थी कार्यशाळा व नियमित गणवेश दरपत्रकांबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील नविन सत्रात ऑगष्ट २०१३ मध्ये प्रवेश घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्यांसाठी आवश्यक असलेले नियमित गणवेष (प्रशिक्षणार्थ्यांचे स्वत:चे खर्चाने) व कार्यशाळा गणवेष (संस्थान खर्चाने) खरेदी करणेकामी वरील संदर्भ क्र.१ चे मा.व्यवस्थापन समितीच्या सभेमध्ये निर्णय क्र.३०८ नुसार मान्यता मिळालेली आहे. खर्चास मान्यतेच्या अधिन अंदाजे रु.४,५१,२००/- च्या खरेदीच्या निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. नियमित गणवेष व कार्यशाळा गणवेष खरेदी करणेकामी १० पुरवठादारांकडून संदर्भ क्र.२ चे पत्राने दरपत्रकांची मागणी करण्यात आलेली होती. दरपत्रक पाठविण्याची अंतिम दि.१९/०९/२०१३ होती. दि.१९/०९/२०१३ अखेर खालील नमुद केलेल्या ०५ पुरवठादारांनी आपली दरपत्रके बंद पाकिटात पोष्टाव्दारे/कुरीयरव्दारे न पाठविता E-mail व्दारा पाठविलेली आहेत.

०१. मे.वोवेन फॅब्रीक कंपनी,मुबंई — ई-मेल व्दारा
०२. मे.एस.आर.एंटरप्रायजेस, पुणे — ई-मेल व्दारा
०३. मे.टिनीमिनी मार्केटींग, अकलुज — ई-मेल व्दारा
०४. मे.हॉस्पीटॅलीटी असेन्सिअल,मुबंई — ई-मेल व्दारा
०५. मे.मंत्री युनिफॉर्म, औरंगाबाद — ई-मेल व्दारा

सदंर्भ क्र.३ चे पत्राने अ.क्र.१,४ व ५ चे पुरवठादारांनी आपली दरपत्रके सिलबंद पाकिटात पाठविणेबाबत तसेच

दरपत्रकातील शर्ती व अटि नुसार दरपत्रकासोबत सुरक्षा निधी अनामत (Earnest Money Deposit) रोखीने अथवा धनाकर्षाव्दारा जमा करणेबाबत कळविण्यात आले होते. त्याची अंतिम दि.१०/१०/२०१३ देण्यात आलेली होती. दि.१८/१०/२०१३ अखेर खालील पुरवठादारांनी आपली दरपत्रके सिलबंद पाकिटात पाठविलेली आहेत.

०१. मे.एस.आर.एंटरप्रायजेस,पुणे — सिलबंद पाकिट
०२. मे.टिनीमिनी ड्रेसेस,अकलुज — सिलबंद पाकिट

वरील पुरवठादारांनी धनाकर्षाचा ई-मेल व्दारा प्रत पाठविलेली आहे. ई-मेल व्दारा प्राप्त झालेली ०५ दरपत्रके ही आपण तात्पुरती पाकिटात (Strapller Pin व्दारा) बंद केली आहेत. आपले दरपत्रक शर्ती व अटिनुसार पुरवठादाराने दरपत्रकासोबत EMD म्हणुन रक्कम रु.२२५००/- रोखीने अथवा धनाकर्षाव्दारे (Demand Draft) जमा करणे आवश्यक आहे. आपले शर्ती व अटिनुसार मे.एस.आर. एंटरप्रायजेस, पुणे व मे.टिनीमिनी ड्रेसेस, अकलुज यांनी धनाकर्ष सिलबंद पाकिटात पाठविल्याचे ई-मेल व्दारे कळविले आहे.

ई-मेल व्दारा प्राप्त झालेली ०५ दरपत्रकामध्ये EMD ची प्रत पाठविलेली ०२ पुरवठादार आहेत व उर्वरित ०३ पुरवठादारांनी EMD बाबत काहीही कळविलेले नाही. मे.एस.आर.एंटरप्रायजेस,पुणे व मे.टिनीमिनी ड्रेसेस,अकलुज यांनी पाठविलेली सिलबंद पाकिटे उघडून प्रशिक्षणार्थी गणवेष खरेदीकरणेकामी त्यांचाच विचार करावा अथवा ई-मेल व्दारा प्राप्त झालेली ०३ दरपत्रके की ज्यांनी आपले शर्ती व अटि नुसार EMD बाबत काहीही कळविलेले नाही त्यांची तुलनात्मक तक्त्यामध्ये दरस्थिती पाहुन न्यूनतम आल्यास पुरवठादाराला EMD भरुन पुरवठा आदेश घेण्याचा पर्याय देता येईल. तसेच ०२ सिलबंद दरपत्रके उघडून न्यूनतम दर असलेल्या पुरवठादाराला पुरवठा आदेश देता येईल. तरी मा. त्रीसदस्य समितीपुढे निर्णयार्थ सादर.

आजचे सभेपुढे प्राप्त झालेली मे.टिनीमिनी ड्रेसेस,अकलुज, मे.एस.आर.एंटरप्रायजेस,पुणे अशी ही दोन दरपत्रके समक्ष उघडण्यात आली.

**निर्णय क्र.८६७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रशिक्षणार्थी कार्यशाळा व नियमित गणवेश खरेदीकामी प्राप्त झालेल्या मे.टिनीमिनी ड्रेसेस,अकलुज व मे.एस.आर.एंटरप्रायजेस,पुणे या दोन दरपत्रकधारकांनी बंद तसेच ई-मेलव्दारे दरपत्रक पाठविले आहे व अन्य तीन मे.मंत्री युनिफॉर्म, औरंगाबाद, मे.वोवेन फॅब्रीक कंपनी,मुबंई व मे.हॉस्पीटॅलीटी असेन्सिअल,मुबंई यांनी आपले दरपत्रकासोबत सुरक्षा रक्कम न भरता ई-मेलव्दारे पाठविले आहे. त्यामुळे सदर प्रक्रिया खरेदीसाठी ग्राह्य धरली जाऊ नये. करीता गणेवश खरेदीसाठी फेर दरपत्रके मागविताना त्यामध्ये संपूर्ण सेटकरीताचे दर व अनामत रक्कम रोखीने भरलेली पावती अगर डिमांड ड्राफ्ट सोबत सादर केल्याशिवाय आपल्या दरपत्रकाचा विचार करण्यात येणार नाही असे त्यामध्ये स्पष्ट नमुद करुन दरपत्रके मागवावीत.**

**तसेच, ०१) मे.टिनीमिनी ड्रेसेस, अकलुज (०२) मे.एस.आर.एंटरप्रायजेस, पुणे यांनी दरपत्रकासोबत सादर केलेले डिमांड ड्राफ्ट त्यांना परत करण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था)

---

**विषय नं.१५** **श्री समाधी मंदिर व दर्शन हॉल वातानूकुलीत करणेबाबत**

**प्रस्ताव-** श्री चुनिलाल खन्ना आणि कंपणी, मुंबई यांनी दि.१२/१०/२०१३ संदर्भिय पत्राव्दारे संपूर्ण समाधी मंदिर व दर्शन लाईन वातानुकूलीत करण्याचे काम देणगीस्वरुपात करणेची ईच्छा प्रदर्शित केली आहे. साईभक्त श्री चुनिलाल खन्ना आणि कं. मुंबई यांनी शांतिनिवास इमारतीचे चारही दर्शनरांग हॉल, भुयारीमार्ग, समाधीमंदीर इ. ठिकाणी ए.सी यंत्रणा देणगीस्वरुपात बसवून देण्याची व त्यानंतर पुढील पाच वर्ष संपूर्ण यंत्रेणेची दुरुस्तीखर्च मोफत करणार असल्याचे कळविले आहे.

श्री समाधी मंदिर (बुटीवाडा) ही एक पुरातन वास्तू असून तीची जपवणुक करणे आवश्यक आहे. यासंदर्भात पुरातत्व विभागास विचारणा करुन त्यांचा अभिप्राय घेवून पुढील कार्यवाही करता येईल. शांतीनिवास, भक्तिनिवास इमारतींचे चारही दर्शन रांगेचे हॉल, समाधी मंदिर व भूयारी मार्ग याठिकाणी छताची उंची कमी असल्याने हवा खेळती राहत नाही. भक्तांच्या गर्दीमुळे सफोकेशन होते. साईभक्तांचे संख्येनुसार पुरेसा ऑक्सीजन हॉलमध्ये येत नसल्याने वृध्द साईभक्त, लहाणमुले, आजारी व्यक्ती यांना गुदमरण्याचा व उष्णतेचा त्रास सहन करावा लागतो.

वरीलप्रमाणे सर्व बाबींचा विचार करता चार दर्शनरांग हॉल, भुयारी दर्शन मार्ग, समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी इ. सर्वच ठिकाणी हवा खेळती राहून पुरेसा ऑक्सीजन व तापमान नियंत्रित असणे गरजेचे आहे. याकरीता देणगीदाखल वातानुकूलित यंत्रणा (ए.सी प्लॅाट) बसवून घेता येईल.

दिवसेंदिवस जागतिक तापमान वाढीचा विचार करता. अपारंपारिक उर्जा स्त्रोताद्वारे पारंपारीक उर्जा बचतीचे दृष्टीकोणातून हि सर्व ए.सी यंत्रणा सोलर यंत्रणेव्दारे चालविता येवू शकते. याबाबत देणगीदार साईभक्तांशी संपर्क करुन अशी यंत्रणा बसविणेकामी चर्चा करुन त्याबाबत त्यांचेकडून डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करता येईल व त्याक्षेत्रातील विषय तज्ञांचे मार्गदर्शन घेवून प्रोजेक्ट उभारणी निश्चित करता येईल.

देणगीदार साईभक्त यांचे पत्रानुसार **अ)** उपरोक्त ठिकाणी देणगी स्वरुपात ए.सी यंत्रणा उभारणेसाठी परवानगी मिळणेस **ब)** सदर यंत्रणा "श्रीं"चे समाधिमंदिर, व्दारकामाई, चावडी इ. पुरातन वास्तुत उभारावयाची असल्याने पुरातत्व विभाग, भारत सरकार Archaeological Survey of India यांना पत्र देवून यंत्रणा उभारणीपूर्वी अभिप्राय मागविणेस मा.व्यस्थापन (त्रिसदस्यीय) समिति सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.१६** **प्रशासकीय अधिकारी पदाचे अतिरिक्त कार्यभाराबाबत.**

**विषय नं.१७** **प्रशासकीय अधिकारी "अतिरिक्त कार्यभाराबाबत" श्री.एस.व्ही.गमे, श्री.एस.एन.गर्कल, श्री.यु.पी.गोंदकर व श्री.डी.टी. उगले प्र.प्रशासकीय अधिकारी यांचे पत्र व त्यांचेकडून प्राप्त झालेल्या उल्लेखनिय अशा महत्वपुर्ण केलेल्या कामाचा अहवाल (Self Assesment Report) बाबत.**

**विषय नं.१८** **श्री.जयंत विश्वनाथ वझे, वरिष्ठ लेखापाल यांचा लेखाधिकारी पदावर पदोन्नती मिळणेबाबतचा अर्ज.**

**निर्णय क्र.८६९** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली** (कार्यवाही- अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **झेरॉक्स मशीनसाठी घेतलेल्या साहित्याच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१३-१४ चे वार्षीक खरेदीसाठी झेरॉक्स मशीनचे साहित्या घेणेसाठी ई टेंडर मागविले होते. ई टेंडरमध्ये झेरॉक्स मशीनचे ड्रम कार्ट्रेज व फ्युजर या साहित्याचे कोटेशन आलेले नाही.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६.०७.२०१३ चे सभेतील निर्णय क्र.६०६. अन्वये, ज्या साहित्याचे दर आलेले नाहीत, अशा साहित्याकरीता फेर निविदा / कोटेशन मागविण्यात यावीत, असे ठरले. त्यास अनुसरुन खालील पुरवठा धारकांकडुन झेरॉक्स मशीनच्या साहित्याचे दर मागविले होते. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | तपशील | ड्रम कार्ट्रेज (मॉडेल नं.५६४५) | ड्रम कार्ट्रेज (मॉडेल नं.५७५५) | फ्युजर मॉडेल (मॉडेल नं.५७५५) | येणारा खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|
| | घेतलेले नग | ०२ | ०५ | ०३ | |
| १ | ओम साई मार्केटींग औरंगाबाद (एका नगाची किंमत) | **४४,०००/-** (५% व्हॅटसह) | **४५,०००/-** (५% व्हॅटसह) | ५०,४००/- (५% व्हॅटसह) | ८८,०००/+२,२५,०००/- **३,१३,०००** |
| २ | सरला एन्टरप्राईजेस औरंगाबाद. (एका नगाची किंमत) | ---- | ---- | **४९,८७५/-** (५% व्हॅटसह) | **१,४९,६२५/-** |
| ३ | श्री एन्टरप्राईजेस औरंगाबाद. (एका नगाची किंमत) | ४४,८००/- (५% व्हॅट) | ४६,२००/- (५% व्हॅट) | ५२,३००/- (५% व्हॅट) | ---- |
| ४ | युनिक्यु इलेक्ट्रॉनिक्स औरंगाबाद (एका नगाची किंमत) | ४४,५००/- (५% व्हॅट) | ४५,७००/- (५% व्हॅटसह) | ५१,५००/- (५% व्हॅट) | ---- |
| | | **रुपये- चार लाख, बासष्ट हजार, सहाशे पंचविस मात्र-** | | | **४,६२,६२५/-** |

दोन झेरॉक्स मशीनला ड्रम कार्ट्रेज व फ्युजर हे साहित्य नसल्यामुळे मशीन बंद होते त्यामुळे झेरॉक्स कामाची अडचण येत होती, म्हणुन मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६.०७.२०१३ चे सभेतील निर्णय क्र.६०६. व झेरॉक्स कामाची गरज यास अनुसरुन उपरोक्त तक्त्यात झेरॉक्स मॉडेल नं.५६४५ व ५७५५ या मशीनसाठी दिलेले ड्रमचे न्युनतम दर, ओम साई मार्केटींग औरंगाबाद यांचे असल्याने त्यांना मालाचा पुरवठा आदेश दिलेला आहे. तसचे झेरॉक्स मॉडेल नं.५७५५ या मशीनसाठी दिलेले फ्युजरचे न्युनतम दर, सरला एन्टरप्राईजस औरंगाबाद यांचे असल्याने त्यांना मालाचा पुरवठा आदेश देऊन त्यांचेकडुन ३ नग फ्युजर मिळालेले आहे.

उपरोक्त साहित्यासाठी रु.४,६२,६२५/- (रुपये- चार लाख, बासष्ट हजार, सहाशे पंचविस मात्र) एवढया खर्चास खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.८७०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व याकामी रु.४,६२,६२५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-सामान्य प्रशासन/ वशी-१२)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **दि.०१/०५/२०११ पासून निवासस्थानाच्या रु १०००/- व त्यावरील रकमेच्या सेवा आकारावर लागू झालेल्या १०.३०% सर्व्हिस टॅक्स बाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद-** २१ (१) चा क मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१/०५/२०११ रोजी झालेल्या सभेमधील आयत्या वेळचा विषय नंबर-०३ व निर्णय क्रं-३३५

**प्रस्ताविक-** नोटिफिकेशन नंबर-३१/२०११ एस.टी. दि.२५/०४/२०११ मध्ये रुपये १०००/- व त्यावरील आकारल्या जाणा-या रक्कमेवर १०.३० % सर्व्हिस टॅक्स नमूद केलेला आहे. त्यावर ५० % सूट असून तो ०५.१५ % दि.०१/०५/२०११ पासून लागू झालेला आहे.

साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेने साईभक्तांसाठी निर्मिलेल्या सर्व भक्तनिवासामधील खोल्यांचे खोली भाडे ऐवजी सेवा आकार (Sanitation Charges) असा शब्द प्रयोग साईभक्तांना देण्यात येणा-या पावत्यावर केलेला आहे. सर्व्हिस टॅक्स भरावयाचा झाल्यास संस्थानकरीता सर्व्हिस टॅक्सचे रजिस्ट्रेशन करणे अनिवार्य होईल व त्यामुळे इतर सर्व व्यवहारावर सर्व्हिस टॅक्स भरावा लागेल. साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० खोल्या ) संकुलामध्ये सध्या खालीलप्रमाणे खोल्यांचा सेवा आकार रु १०००/- मात्र आकारला जातो.

**ए) सध्याचे सेवा आकार**

| अं.क्र. | खोलीचा तपशील | आकारण्यात येणार सेवा आकार | जादा व्यक्तीस आकारण्यात येणारा सेवा आकार. |
|---|---|---|---|
| १ | ए तळमाळा ए-१ ए/सी व्ही.आय.पी. व्यक्ती मर्यादा - ०६ खोली कोड- ५१५०१ | १०००/- रुपये. | पुढिल ०२ जादा व्यक्ती पर्यंत प्रति व्यक्तीस रु १००/- प्रमाणे. **टिप- सध्या सदर ब्लॉक श्वानपथकास मोफत दिलेला आहे.** |
| २ | ए तळमाळा बी-१ ए/सी व्ही.आय.पी. व्यक्ती मर्यादा - ०६ खोली कोड- ५२५०१ | १०००/- रुपये. | पुढिल ०२ जादा व्यक्ती पर्यंत प्रति व्यक्तीस रु १००/- प्रमाणे. |
| ३ | डी/ए दुसरा माळा डि-१ ए/सी व्ही.आय.पी. व्यक्ती मर्यादा -०६ खोली कोड - ५४६०१ | १०००/- रुपये. | पुढिल ०२ जादा व्यक्ती पर्यंत प्रति व्यक्तीस रु १००/- प्रमाणे |

**संस्थान अधिनियम/ठराव या नुसार छाननी,शासन निर्देश, तांत्रीक/कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ.छाननी करुन अनुमान-**

१) अर्थ मंत्रालयाच्या महसुल विभागाचे नोटीफिकेशन नंबर २९,३१, ३४ दि.२५/०४/२०११ पासुन अ) निवासस्थान व्यवस्था. ब) रेस्टॉरंट व्यवस्था या सेवा सर्व्हिस टॅक्सचे कक्षेत आणल्या आहेत. त्यामध्ये जर खोलीचे भाडे रुपये १०००/- पेक्षा कमी असेल तर त्यावर सर्व्हिस टॅक्स आकारला जाणार नाही असे नमुद आहे.

२) यास अनुसरुन द्वारावती भक्तनिवासस्थान विभागाने दि.२१/०५/२०११ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेमधील विषय नं. ०३ व निर्णय क्र.३३५ अन्वये द्वारावती भक्तनिवास ए/सी रुमकरीता ३ व्यक्तींसाठी रुपये ९००/- सेवा आकार त्वरीत अंमलात आणावा. तसेच जादा व्यक्ती असल्यास जादा बेड करीता रुपये ५०/- प्रति व्यक्तीस घेऊन तो Mattress Charges मध्ये दर्शविण्यात यावा, असे ठरले.

सदर बाबत संस्थानचे लेखापरिक्षक मे. अभय ए. शास्त्री एन्ड असो.,पुणे यांनी त्यांचे कायदेशीर मत दिले आहे त्यात 1) To Keep the declared tariff of Accommodation Services around Rs.900/- (Rs. Nine hundred only) so that sss remains outside the ambit of Servece Tax Act. असे नमूद केले आहे.

**विभागाची मागणी** - दि.२१/०५/२०११ चे सभेतील आयत्या वेळेचा विषय नंबर-३ निर्णय क्रं-३३५ ने द्वारावती भक्तनिवास ए/सी रुमकरीता ३ व्यक्तींसाठी रुपये ९००/- सेवा आकार त्वरीत अंमलात आणावा. तसेच जादा व्यक्ती असल्यास जादा बेड करीता रुपये ५०/- प्रति व्यक्तीस घेऊन तो Mattress Charges मध्ये दर्शविण्यात यावा, असा निर्णय समंत झालेला आहे. त्याचप्रमाणे साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडील खालीलप्रमाणे खोल्यांचा सेवा आकार कमी करावा लागणार आहे त्यामुळे सर्व्हिस टॅक्स आदा करावा लागणार नाही.

**बी) प्रस्तावित सेवा आकार**

| **अं.क्र.** | **खोलीचा तपशील** | **प्रस्तावित सेवा आकार** | **जादा व्यक्तीस आकारण्यात येणारा सेवा आकार.** |
|---|---|---|---|
| १ | ए तळमाळा ए-१ ए/सी व्ही.आय.पी. व्यक्ती मर्यादा - ०६ खोली कोड- ५१५०१ | ९००/- रुपये | पुढिल ०२ जादा व्यक्ती पर्यंत प्रति व्यक्तीस रु ५०/- प्रमाणे. (सदरची नोंद Mattress Charges म्हणून करण्यात यावी.) |
| २ | ए तळमाळा बी-१ ए/सी व्ही.आय.पी. व्यक्ती मर्यादा -०६ खोली कोड-५२५०१ | ९००/- रुपये | पुढिल ०२ जादा व्यक्ती पर्यंत प्रति व्यक्तीस रु ५०/- प्रमाणे (सदरची नोंद Mattress Charges म्हणून करण्यात यावी.) |
| ३ | डी/ए दुसरा माळा डि-१ ए/सी व्ही.आय.पी. व्यक्ती मर्यादा -०६ खोली कोड - ५४६०१ | ९००/- रुपये | पुढिल ०२ जादा व्यक्ती पर्यंत प्रति व्यक्तीस रु ५०/- प्रमाणे (सदरची नोंद Mattress Charges म्हणून करण्यात यावी.) |

**विभागाचा अभिप्राय-** साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाचे (५०० रुम) दि.२१/०५/२०११ रोजीचे ठरावास अनुसरून मुळ भाडे ( सेवा आकार, डिक्लेअर टेरिफ) रुपये १०००/- ऐवजी रुपये ९००/- सहा व्यक्तीकरीता व पुढिल ०२ व्यक्तीपर्यंत रुपये ५०/- प्रमाणे Mattress Charges म्हणून घेणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समिती समोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८७१ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, भक्तनिवासस्थान)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **श्री विरभद्र बिरोबा बन येथील श्री विरभद्र यात्रेतील कुस्त्यांच्या हंगामाकरिता आर्थिक मदत देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.हरी हेमा बनकर, श्री.विरभद्र दल, बिरोबा-बन, शिर्डी (बिरेगांव बन) यांनी त्यांचे दिनांक १८/१०/२०१३ रोजीचे अर्जात विरभद्र (बिरोबा) या दैवताची यात्रा हि १५/११/२०१३ ते १७/११/२०१३ अखेर बिरोबा बन, शिर्डी येथे मोठया थाटात भरणार असून यात दि.१७/११/२०१३ रोजी कुस्ती हगामही आयोजित केलेला आहे. या कुस्त्यात भाग घेणाऱ्या व विजयी पहिलवानांना वाटण्यासाठी म्हणून मागील वर्षी रु.७५,०००/- रक्कम मिळाली होती. तरी यावर्षीही रु.१,००,०००/- ची आर्थिक मदत मिळावी अशी विनंती केलेली आहे.

दि.१७/११/२००४ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.११९ नुसार एक विशेष बाब म्हणून विरभद्र यात्रा बन, शिर्डी यांना दि.२६/११/२००४ रोजी होणाऱ्या कुत्स्त्यांच्या हगाम्यासाठी रु.२५ हजार रक्कम श्री रामनवमी उत्सवाप्रमाणे संस्थान प्रतिनिधी नेमून देण्यात यावी, असे ठरल्याप्रमाणे रक्कम देणेत आली होती. तसेच त्यानंतर दरवर्षी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार खालीलप्रमाणे रक्कम मंजूर करुन वाटणेत आलेली आहे.

| अ.नं. | सभेची तारीख व निर्णय क्र. | मंजूर रक्कम | प्रत्येक्ष खर्च |
|---|---|---|---|
| १ | दि.१७/११/२००४, निर्णय क्र.११९ | २५,०००-०० | २४,४९९-०० |
| २ | दि.५/११/२००५, निर्णय क्र. ७१२ | ५०,०००-०० | ४८,१५२-०० |
| ३ | दि. १४/१०/२००६ निर्णय क्र.८६६ | ५०,०००-०० | ४३,५३३.०० |
| ४ | दि.१८/११/२००७ निर्णय क्र.७८२ | ५०,०००-०० | ४९,०२०.०० |
| ५ | दि.३/१/२००८ निर्णय क्र.०४(१९) | ७५,०००-०० | ६४,०८०-०० |
| ६ | दि.७/११/२००९ निर्णय क्र.८६७ | ७५,०००-०० | ६९,५७०-०० |
| ७ | दि.२१/१०/२०१० निर्णय क्र.९२३ | ७५,०००-०० | ७२,०८०-०० |
| ८ | दि.१४/१/२०१२ निर्णय क्र.१३१ | ७५,०००-०० | ७०,२७०-०० |
| ९ | दि.३०/११/२०१२ निर्णय क्र.९४८ | ७५,०००-०० | ७०,२७०-०० |

दिनांक ३०/११/२०१२ रोजीचे व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.९४८ नुसार मागील वर्षी सदरकामी रु.७५,०००/- मात्रची आर्थिक मदत संस्थानमार्फत देण्यात आली होती. त्यापैकी रु.७०,२७०/- इतकी रक्कम बिदागी म्हणून वाटली असून उर्वरीत रक्कम लेखाशाखेत जमा-नांवे करण्यात आलेली होती.

चालू वर्षी गेल्या वर्षाप्रमाणे रुपये ७५,०००/- मंजुर करुन श्री रामनवमी उत्सवातील प्रथेप्रमाणे संस्थानचा प्रतिनिधी (लेखाशाखेतील कर्मचारी) नियुक्त करुन विजयी पहिलवांनाना बिदागी म्हणून रक्कम वाटून ऊर्वरीत रक्कम लेखाशाखेत जमा नावे करण्यात येईल.

मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८७२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

**निर्णय क्र.८७३** **मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-**

**(१)** संस्थानचे सध्या असलेल्या साई व्दारावती, साईबाबा भक्तनिवास, साईआश्रम भक्तनिवास-०१ या निवासस्थानामध्ये ऑनलाईन बुकींगचे प्रमाण सध्या असलेल्या टक्केवारीवरुन ते प्रत्येकी निवासस्थानामध्ये ९० टक्के याप्रमाणे करण्यात यावे. साईप्रसाद निवासस्थानाकडील खोल्या प्रथम येणा-या साईभक्तास प्रथम खोली याप्रमाणे उपलब्धतेनुसार संस्थान नियमाप्रमाणे देण्यात याव्या.

(कार्यवाही- सर्व निवासस्थाने/ माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख)

**(२)** साईआश्रम धर्मशाळेमध्ये साईभक्तांची जास्तीजास्त दोन दिवस निवासव्यवस्था करणेत यावी व ओळखपत्र असले शिवाय कोणत्याही साईभक्तास राहणेसाठी परवानगी देऊ नये.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम धर्मशाळा)

**(३)** दि.२६.०७.२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५९७ अन्वये श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयासाठी आवश्यक असलेल्या बेंचेस वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर बेंचेस खरेदी तातडीची असल्यामुळे दोन टप्प्यात करणेत यावी.

(कार्यवाही- प्र.प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय/ अधिक्षक, खरेदी विभाग)

---

वरील निर्णय क्र.८५४ ते ८७३ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायंकाळी ०४.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| (अजय मोरे) | (जयंत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी